**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT -V**
**2022-2023**

**STD: V** | **TIME:-2HRS**
**SUB: MARATHI.** | **MARKS-40**

---

**प्रश्न १-खालील पठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

गौरवचा प्रसंगावधान बाळगून वागण्याचे आजोबांना खूप कौतुक वाटले .पाठीवर शाबासकी देत ते म्हणाले, "बाळा शाळेने व तुझ्या कुटुंबाने तुझ्यावर खूप चांगले संस्कार केले आहेत." गौरव आणि आजोबा बोलत - बोलत रस्त्यालगतच्या एका झाडाच्या पारावर बसले.आजोबांबद्दल गौरवला मोठा आदर आणि प्रेम वाटले. मी रोज शाळा सुटल्यावर याच ठिकाणी तुम्हाला निरनिराळे वर्तमानपत्र, कथा ,पुस्तके वाचून दाखवेन. हा त्याचा संकल्प त्यांने आजोबांना बोलून दाखविला. आजोबा भारावून गेले, 'माणुसकीचा झरा' असाच तुझ्या हृदयात अखंड राहू दे' असा थरथरत्या हाताने आजोबांनी आशीर्वाद दिला. गौरवला आपण एका चांगल्या कामाची सुरुवात केली याचे समाधान वाटले.

**क) खाली दिलेल्या शब्दांचे अर्थ लिहा.** **(२गुण)**

१) माणुसकी= २) संस्कार=

**ख) कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **(१गुण)**

१) "बाळा, शाळेने व तुझ्या कुटुंबाने तुझ्यावर खूप चांगले संस्कार केले आहेत."

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२गुण)**

१) गौरवला आजोबांबद्दल काय वाटले?

२) गौरव रोज शाळा सुटल्यानंतर काय करणार होता?

**घ) स्व-अध्ययन** **(२गुण)**

१)तुमच्या मते माणुसकी म्हणजे काय? तुम्ही केलेल्या एका चांगल्या कामाविषयी लिहा?

**प्रश्न २- क) खाली दिलेल्या शब्दांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.** **(४गुण)**

१) गौरव= २)संस्कार=

**ख) खाली दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही चार)** **(४गुण)**

१) नामदेव तीर्थयात्रा करत कुठे पोहोचले?

२) गौरव शाळेत कसा जायचा?

३) गुरुत्वाकर्षण नियमाचा शोध कोणी लावला?

४)माणसाचा सर्वात मोठा गुण कोणता?

५)जेम्स वॅटने कशाचे निरीक्षण केले?

**ग) खाली दिलेल्या प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही दोन)** **(४गुण)**

१) विमानाच्या रचनेमागे मूळ इच्छा काय होती?

२) गौरवने कोणता संकल्प केला?

३) संत नामदेव यांच्या विषयी माहिती लिहा?

४) चुलीवरचे किटलीचे झाकण का उडत होते?

Scanned with OKEN Scanner

## अपठित गद्यांश

**प्रश्न-३- खालील अपठीत उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

लक्ष्मणराव किर्लोस्करांचा जन्म एका छोट्याशा गावात झाला. लहानपणापासून त्यांचे नेमलेल्या अभ्यासात मुळीच लक्ष नव्हते. मोकडी तुकडी घड्याळे चित्रे, खडू, कोळसा अशा वस्तू ते गोळा करीत स्टेशनवर जाऊन आगगाडीचे इंजिन पाहत बसायला त्यांना खूप आवडायचे. शाळेत देखील गणित, संस्कृती विषय त्यांना मुळीच आवडायचे नाहीत. मात्र भूमिती, भूगोल आणि चित्रकला हे त्यांचे आवडते विषय होते. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांच्या विलक्षण आवड त्यामुळे शिक्षण सोडून ते एका भांडी बनवायच्या कारखान्यांमध्ये काम करू लागले.

**क) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** (२गुण)

१)लक्ष्मणराव किर्लोस्करांचा जन्म एका ________ गावात झाला.

२)____________ इंजिन पाहत बसायला त्यांना खूप आवडायचे.

**ख) चुक की बरोबर ते लिहा.** (२गुण)

१) लक्ष्मणराव किर्लोस्कर अभ्यासात खूप हुशार होते.

२) किर्लोस्कर यांना वेगवेगळ्या वस्तू गोळा करायचा खूप छंद होता.

**ग) खाली दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** (२गुण)

१) लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचे कशात लक्ष लागत नव्हते?

२) लक्ष्मणराव किर्लोस्कर यांना कोणते विषय आवडायचे?

## व्याकरण

**प्रश्न४-क) खाली दिलेल्या शब्दांचे लिंग बदला लिहा.** (२गुण)

१) वडील=. २) बैल=

**ख) अधोरेखित केलेल्या शब्दांचे लिंग ओळखा.** (३गुण)

१) रमेश मैदानात आला.

२) गोष्टीचे पुस्तक खूप छान आहे.

३) नदीतील पाणी खूप गार आहे.

**ग) समानार्थी शब्द लिहा.** (२गुण)

१) ऊर्जा= २) आश्चर्य=

**घ) विरुद्धार्थी शब्द लिहा.** (३गुण)

१) आयात× २) उदास× ३) उतरणे×

## पत्रलेखन

**प्रश्न ५-खाली दिलेल्या पत्रलेखनापैकी कोणतेही एक पत्र लिहा.** (५गुण)

१) वन महोत्सवात वृक्षारोपण करण्यासाठी रोपे मागणारे पत्र.

२) तुमच्या मित्राला निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले त्यासाठी अभिनंदन करणारे पत्र लिहा.

****************************

Scanned with OKEN Scanner